# २२. आम्ही खरेदी करतो

- चित्र पाहा. चित्रात काय काय दिसते ते सांगा.





- वस्तू पाहा. त्यांच्या किमती पाहा. वस्तूंची नावे व किमती सांगा.



रबर



पेन्सिल




पेन




वही




रंगपेटी



कंपासपेटी



टोकयंत्र



पट्टी



स्टेपलर



दप्तर

- खालील नोटा व नाण्यांचे निरीक्षण करा. त्या किती किमतीच्या आहेत ते सांगा.



- **उपक्रम :** कोऱ्या कागदाखाली नाणे ठेवा. कागदावर पेन्सिलने हलक्या हाताने घासा. छाप तयार होईल. आणखी कशाकशाने छाप तयार करता येतील, त्याचा विचार करा व छाप तयार करा.

**शिक्षकांसाठी :** प्रत्यक्ष नाणी, नोटा किंवा त्यांची प्रतिरूपे विद्यार्थ्यांना हाताळण्यास द्यावी. ते ओळखण्यास सांगावे. शिक्षकांनी वस्तू व त्यांच्या किमती यावर विद्यार्थ्यांशी गप्पा माराव्या. प्रश्न विचारावे. वर्गात दुकान लावावे. त्यात वस्तू ठेवाव्या. टेबलावर नाणी, नोटा ठेवाव्या. तिथल्या नाणी, नोटा घेऊन विद्यार्थ्यांना खरेदी करायला सांगावे. ग्राहक व दुकानदार यांच्या भूमिका आलटून पालटून करायला सांगाव्या. विद्यार्थ्यांना नोटांची उलट बाजू पाहायला सांगावी. त्यावर काय काय लिहिले आहे ते विचारावे.